
किनवट शिक्षण संस्थेचे, नॅक पुनर्मूल्यांकित (बी++)
बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
किनवट ता.किनवट जि.नांदेड
राष्ट्रीय सेवा योजना
ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय विभाग)
वाचन संकल्प महाराष्ट्राचा
दिनांक ०१ ते १५ जानेवारी २०२५
:: उपक्रम ::
ग्रंथप्रदर्शन
वाचन कौशल्य कार्यशाळा
वाचन संवाद
सामुहिक वाचन

दैनिक
निर्भिड व धडक बातम्यांसाठी
विष्णुपूरी एक्सप्रेस
दि.02 जानेवारी 2025

# बळीराम पाटील महाविद्यालयात सामूहिक वाचन अभियान संपन्न




**किनवट/प्रतिनिधी**

बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किनवट येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियान उपक्रमानांतर्गत वाचन संस्कृती जोपासण्यासाठी व्याख्यान व सामुहिक वाचच अभियान संपन्न झाले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. के. बेंबरेकर कार्यक्रमाचे अध्यक्ष होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अनिल पाटील व डॉ. गजानन वानखेडे हे होते.याप्रसंगी ते बोलतांना म्हणाले की वाचाल तर वाचाल वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञान कक्षा विस्तृत होतात.त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमितपणे वाचन संस्कृती अंगी करावी व वाचनास चालना द्यावी वाचन हा छंद म्हणून जोपासावा असे ते आपल्या भाषणात बोलतांना म्हणाले कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. शुभांगी दिवे यांनी केले.

याप्रसंगी मंचावर उपस्थित डॉ. पंजाब शेरे हे होते. स्वागताच्या कार्यक्रमानंतर लगेचच विद्यार्थ्यां नी सामुहिक वाचन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डी.टी. चाटे प्रा.डाॅ. रत्ना कोमावार दिपक खंदारे यांनी मेहनत घेतली कार्यक्रमाला प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.शेषराव माने यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डी..टी चाटे यांनी केले.


दि.03/01/2025
बळीराम पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट
“वाचन संकल्प महाराष्ट्राचा”
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व वाचन संस्कृती


दि.03/01/2025
बळीराम पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट
“वाचन संकल्प महाराष्ट्राचा”
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व वाचन संस्कृती


दि.03/01/2025
बळीराम पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट
“वाचन संकल्प महाराष्ट्राचा”
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व वाचन संस्कृती


READING ROOM RULES
LIBRARY.
JUST BRING YOUR
OWN CONTAINER.
Books/Journals/Periodicals
Are Valuable. Do not tear or Damage them.


LIBRARY.
JUST BRING YOUR
OWN CONTAINER
कृपया शांत रहिए।

दैनिक बहुरंगी वार्ता
गुरुवार १७ ऑक्टोबर २०२४

# वाचनामुळे विद्यार्थ्यांची अनुभव कक्षा विस्तृत होते– प्रा. शेषराव माने

**प्रतिनिधी, किनवट**

**बळीराम** पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किनवट येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारताचे अकरावे राष्ट्रपती डॉ ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी करण्यात आली. प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के.बेंबरेकर हे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. शेषराव माने यांनी केले. ते बोलताना म्हणाले की दुर्दम्य इच्छाशक्ती असणाऱ्या आणि ठाम आत्मविश्वास असणाऱ्या डॉ. कलाम यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू होते. नितळ मन आणि दिलदार स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. देशाच्या युवा पिढीला त्यांनी आपल्या विचारांनी आणि कर्तृत्वाने भारावून टाकले होते. भारत नक्कीच महासत्ता बनेल, हा विश्वास त्यांनी प्रत्येक भारतीयाच्या मनात निर्माण केला होता. त्यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांमधून येणाऱ्या काळात भारत कसा महासत्ता म्हणून पुढे येणार आहे, भारताची खरी शक्ती ही युवाशक्ती कशी असणार आहे हे त्यांनी सांगितले आहे. डॉ. कलाम यांचे लेखन स्फूर्तीदायी आहे. डॉ. कलाम नेहमी म्हणत असत की, एक चांगले पुस्तक शंभर मित्रांप्रमाणे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी डॉ.कलाम यांची पुस्तके वाचावीत, त्याचबरोबर इतर साहित्याचेही जास्तीत जास्त वाचन करावे त्यामुळे अनुभव कक्षा विस्तृत होतात आसे ते म्हणाले.






डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला महिविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के.बेंबरेकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ पंजाब शेरे, पर्यवेक्षक प्रा.विजय खुपसे,डॉ. आनंद भालेराव, सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ जी.बी.लांब,प्रा. अनिल पाटील, ग्रंथालय विभाग प्रमुख मंदाकिनी राठोड, डॉ .प्रज्ञा घोडवाडीकर,डॉ. जी. एस.वानखेडे प्रा. आम्रपाली हटकर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डी टी चाटे, प्रा. पुरुषोत्तम येरडलावार, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. शुभांगी दिवे, डॉ स्वाती कुरमे, डॉ.विजया खामनकर,दीपक खंदारे, काशिनाथ पिंपरे, गौरव पवार ,जान्वी सराफ, असबा शेख, विनायक पोंतकटवार, सुधांशू लिंगमपेल्लीवार बहुसंख्येने रासेयो स्वयंसेवक, स्वयंसेविका उपस्थित होते. उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.शुभांगी दिवे यांनी मानले.

सुविचार- समय का उत्तम उपयोग करना सीखें क्योंकि विश्व के ज्यादातर सफल मनुष्यों ने इसी का प्रयोग किया है।

ANTARNAD 24

# अंतर्नाद

उमरी. नायगांव. धर्माबाद. देगलुर. भोकर. मुदखेड. अर्धापूर - नांदेड महाराष्ट्र 431807.
संपादक - डॉ. बोईनवाड कृष्णा

email: sankihawa@gmail.com UDYAM-MH-21-0057321. Reg No: MH21E0011740

Top News नायगाव प्रति. सदाशिव आंदेलवाड

## बळीराम पाटील महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभिनव उपक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शन.

किनवट- बळीराम पाटील कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात 31 डिसेंबर 2024 रोजी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले .याप्रसंगी वाचनाने नवीन ज्ञानाची दारे खुली होतात, वाचनाच्या चांगल्या सवयीमुळे शब्दसंग्रह सुधारतो ,आत्मविश्वास निर्माण होतो, बोलणे आणि लेखन कौशल्य सुधारते तसेच लक्ष केंद्रित आणि एकाग्रता सुधारते असे उपप्राचार्य डॉक्टर पंजाब शेरे यांनी ग्रंथ प्रदर्शनात विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व प्रतिपादन केले याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.शुभांगी दिवे आणि आभार प्राध्यापक डी टी चाटे यांनी केले .या कार्यक्रमाला उपस्थित पर्यवेक्षक प्रा. विजय खुपसे ,प्रा. डॉ. अनिल पाटील, प्रा.डॉ. गजानन वानखेडे, प्रा. शिवदास बोकडे ,किशोर आडे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमात ग्रंथालयाचे गौरव पवार यांनी ग्रंथालय प्रदर्शनासाठी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.




वाचनाच्या चांगल्या सवयीमुळे शब्दसंग्रह सुधारतो ,आत्मविश्वास निर्माण होतो, बोलणे आणि लेखन कौशल्य सुधारते तसेच लक्ष केंद्रित आणि एकाग्रता सुधारते.